अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार दि. १ डिसेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ६५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# कन्फ्युजन ही कन्फ्युजन है, सोल्युशन का कुछ पता नही



## ▪ विमानसेवा सुरू होणार? कोण करणार : माहीत नाही
## ▪ चिमणी पडणार? कारखाना बंद होणार? : माहीत नाही

सुराज्य/सोलापूर

**सोलापूरच्या विकासासाठी सोलापुरातून नियमित विमानसेवा सुरू झाली पाहिजे, हे सर्वच सोलापूरकरांचे मत आहे. पण विमानसेवा कधी सुरू होणार? होणार असेल तर कोण करणार? याचे कोणतेही उत्तर आज कोणाकडेही नाही. दुसरीकडे चिमणी पाडणार का? पाडल्यास कारखाना बंद होणार का? बंद झाल्यास सध्याच्या गाळपाचे काय? शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचे नियोजन काय? याचा कोणताच थांगपत्ता नाही. मात्र एका बाजूला चिमणी हटाव आणि दुसऱ्या बाजूला चिमणी बचाव आंदोलन दिवसेंदिवस जोर धरू लागले आहे. त्यामुळे कन्फ्युजन ही 'कन्फ्युजन है, सोल्युशन का कुछ पता नही' अशी अवस्था सोलापूरकरांसह सोलापूरच्या प्रशासनाचीही झाली आहे.**

सोलापूरच्या जुन्या उद्योग विश्वातील जिवंत असणारा एकमेव उद्योग म्हणजे सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना आहे. उद्योगनगरी सोलापुरातील बहुतांश जुने उद्योग बंद पडले. त्यापैकी आजही तग धरून आहे तो सिध्देश्वर साखर कारखाना. अर्थात सोलापूरच्या आर्थिक विकासात सिध्देश्वर साखर कारखान्याचे योगदान आहेच. आता सोलापूरचा झपाट्याने विकास होण्यासाठी सोलापूरला नियमित विमानसेवेची गरज आहे. विमानतळ आहे पण विमानसेवा नाही. विमानसेवा सुरू होण्यासाठी आता सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणीचा अडसर आहे. म्हणजेच सोलापूरच्या विकासाची मुहुर्तमेढ असणारा सिध्देश्वर कारखानाच आज सोलापूरच्या विकासातील अडथळा बनला आहे. मात्र विमानसेवा सुरू करण्याचे कोणतेच नियोजन सध्या कोणाकडेही नाही. दुसऱ्या बाजूला चिमणी पाडण्यासाठी कारखाना बंद करावा लागतो. कारखाना बंद करण्यासाठी आवश्यक असणारे नियोजनसुध्दा कोणाकडेही नाही. त्यामुळे चिमणी पडली तर विमानसेवा कशी सुरू करायची? आणि कारखाना बंद झाल्यास क्षेत्रातील ऊस गाळपाचे काय करायचे? याचे कोणतेच नियोजन नसल्यामुळे सर्वच पातळ्यांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.



### विमानसेवेबाबत संभ्रम
चिमणी पाडल्यानंतर कधीपासून विमानसेवा सुरू होईल? विमानसेवा पुरवण्यासाठी कोणत्या कंपन्या तयार आहेत? विमानसेवा कशी असेल? होटगीरोड विमानातळ अन्य कोणत्या शहरांसोबत जोडले जाणार? याबाबत कोणतीही खात्रीशीर माहिती आज प्रशासनाकडे नाही. त्यामुळे उद्या चिमणी पडली तर परवापासून विमानसेवा सुरू करण्याबाबतचा कोणाताही निश्चित असा कार्यक्रम नसल्यामुळे विमानसेवेबाबत सध्या तरी संभ्रमच आहे.

### कारखाना बंद झाल्यास ऊस गाळपाचे काय?
गाळप हंगाम सुरू असताना चिमणी पाडायची म्हणजे कारखान्याचे गाळप बंद करावे लागणार आहे. कारखाना बंद केला तर कारखाना कार्यक्षेत्रातील उसाचे काय करायचे? तो कोणत्या कारखान्याकडे वळवायचा? अतिरिक्त ऊस गाळप करण्याची क्षमता कोणत्या कारखान्यांकडे आहे? हंगाम लांबल्यास पिकांचा हंगामही बदलणार आहे. त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे? त्याचे नियोजन काय? याचे उत्तर कोणाकडेही नाही.

### अनेक घटक कर्जबाजारी होतील
चिमणी पाडण्यासाठी गाळप थांबवल्यास गाळपावर अवलंबून असणारे अन्य उद्योग आर्थिक संकटात येतील. तोडणी आणि वाहतूक करणाऱ्यांची उचलसुध्दा फिटणार नाही. वाहतुकीसाठी कर्ज काढून घेतलेल्या वाहनांचे हप्ते फिटणार नाहीत. अशा कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थाही आर्थिक अडचणीत येतील. अर्थात कारखान्यावर अवलंबून असणारे अर्थकारण आर्थिक कोंडीत सापडेल. त्यासंदर्भातील नियोजनही अद्याप झाले नाही. त्यापूर्वीच दोन्ही बाजूने आंदोलन सुरू झाल्यामुळे गोंधळ उडाला आहे.

### नियोजन नसताना आयोजन
विमानसेवा नाही ही सोलापूरकरांची समस्या आहे. चिमणी पाडल्यानंतर करायचे काय? हीसुध्दा समस्या आहे. विमानसेवेचे नियोजन नाही. चिमणी पाडण्याचे आणि पाडल्यानंतर येणाऱ्या समस्या सोडवण्याचे नियोजन नाही. म्हणजेच कोणतेही नियोजन नसताना आंदोलनाचे आयोजन करून दोन्ही बाजूच्या आंदोलकांना काय साध्य होणार आहे? हेसुध्दा निश्चित नाही. त्यामुळे आंदोलन आणि आंदोलनाचा गोंधळ हेच चित्र सध्या दिसत आहे.

## काडादीनंतर आता केतन शहा यांना पोलिसांची नोटीस

सुराज्य/सोलापूर

रिव्हॉल्व्हर दाखवून धमकी दिल्या प्रकरणी सोलापुरात उद्योजक केतन शहा विरुद्ध साखर कारखानदार धर्मराज काडादी असे चित्र निर्माण झाले आहे. या प्रकरणात धर्मराज काडादी यांना मंगळवारी नोटीस बजावली बुधवारी धर्मराज काढल्यानंतर आता केतनशहा यांनाही नोटीस बजावून आपली लेखी तक्रार द्या. आम्ही कारवाई करू असे या नोटिसात नमूद केले आहे.

केतन शहा यांना धर्मराज काडादी यांनी २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी रिव्हॉल्व्हर दाखवून धमकि दिली होती.याचा व्हिडीओ देखील सोशल मीडियावर वायरल झाला होता.यानंतर केतन शहा व त्यांच्या सोबत इतर सहकारी सदर बाजार पोलीस ठाणे येथे येऊन तक्रार न देता तसेच परत गेले. पोलिसांनी स्वतःहुन गुन्हा दाखल करावे अशी मागणी केतन शहा यांनी केली. यावर पोलिसांनी केतन शहा यांना लेखी उत्तर मागितले असुन तुमची तक्रार असेल तर लेखी द्या,अन्यथा पोलिसांची प्रतिमा मालिन करू नका असे नोटीसमध्ये सांगितले आहे. रिव्हॉल्व्हर प्रकरणी पोलिस आयुक्तांनी धर्मराज काडादी यांना खुलासा मागितला असताना, आता, केतन शहा यांना देखील तक्रार द्यावी अशी नोटीस देण्यात आली आहे.

## पत्नीला औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली येथे माहेरून पैसे घेऊन येत नसल्यामुळे पत्नीस बेदम मारहाण करून तिला गोचीड मारण्याचे औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पती विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी दिली.

याप्रकरणी सुनील लक्ष्मण लामकाने याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील याचा २००९ साली तालुक्यातील खेडभोसे येथील मनीषा हिच्याबरोबर विवाह झाला होता. मात्र दारूचे व्यसन असल्यामुळे लग्नानंतर काही दिवसातच त्याने पत्नीस माहेरून पैसे आणावेत म्हणून जाचहाट सुरू केला. सुनील वारंवार पत्नीस शिवीगाळ करून मारहाण करीत होता. यामुळे चार वर्षांपूर्वी मनीषाचे वडील विठ्ठल पवार आपल्या लेकीला माहेरी घेऊन आले होते. तसेच सुनील याच्या विरोधात न्यायालयात तक्रार देखील दाखल केली होती. मात्र हा वाद सामोपचाराने मिटवण्यात आला. यानंतर पुन्हा ती सासरी नांदण्यास आली. मात्र काही दिवसात पुन्हा त्याने माहेरून खर्चासाठी पैसे आण म्हणून तगादा लावला व मारहाण सुरू केली होती.




नऊ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मनीषा स्वयंपाक करीत असताना दारू पिऊन आलेल्या सुनीलने तिला पुन्हा शिवीगाळ करून घर खर्चासाठी वडिलांकडून पैसे आण म्हणून दमदाटी सुरू केली. तसेच उसाने मारहाण करू लागला. यामुळे मनीषाने पतीस घराबाहेर ढकलून घराचा दरवाजा बंद केला. मात्र त्याने खिडकी तोडून आत मध्ये प्रवेश केला व पत्नीला खाली पाडून घरात गोचीड मारण्यासाठी ठेवलेले औषध बळजबरीने तिला पाजले. हा गोंधळ पाहून मुलं, सासू व दीर धावून आले व तातडीने मनीषाला पंढरपूर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातून घरी आल्यानंतर मनीषा हिने पतीच्या विरोधात जाचहाट, मानसिक व शारीरिक त्रास तसेच जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. यावरून आरोपी सुनील लामकाने यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यास चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## नितीन नगरात तरुणाची आत्महत्या

सोलापूर : एमआयडीसी परिसरातील नितीन नगरात राहणाऱ्या एका २७ वर्षीय अविवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज बुधवारी सकाळच्या सुमारास घडली.

तात्या श्रीशैल कोरे (वय २७ रा.नितीन नगर) असे मयताचे नाव आहे. त्याचा मतदेह आज सकाळी १० वाजेच्या सुमारास घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत तात्या कोरे याच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. त्याचा सुनील नगर परिसरात हेअर कटिंग सलूनचे दुकान आहे. सकाळी दुकानात काम करून तो घराकडे जाऊन येतो म्हणून गेला होता. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

## पुन्हा संजू सॅमसनला वगळले; चाहते भडकले




मुंबई : न्यूझीलंडविरुद्ध तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातून पुन्हा संजू सॅमसनला वगळण्यात आलं. ज्यानंतर सोशल मीडियावर वी वॉन्ट संजू ट्रेन्ड सुरू झालाय. चाहत्यांनी भारताच्या प्लेईंग इलेव्हनबाबत रश्नचिन्ह उपस्थित करत संघ व्यवस्थापनाच्या निर्णायाला बोट दाखवत आहे. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात संजू सॅमसनला खेळवलं जाईल, अशी शक्यता होती. आम्हाला सहावा गोलंदाजीचा पर्याय हवा होता. म्हणून सॅमसनला वगळावं लागलं असं शिखर धवनने म्हटलं आहे.

## रथाचे चाक पायावरून गेल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

सोलापूर : गावातील खंडोबाच्या यात्रेत रथाचे दगडी चाक पायावरून गेल्याने ६० वर्षीय वृद्ध शेतकरी गंभीर जखमी होऊन मरण पावले. ही दुर्घटना दहिफळ (ता.कळंब जि.उस्मानाबाद) येथे मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.

गोरख निवृत्ती खंडागळे (वय ६० रा. दहिफळ ता.कळंब) असे मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. काल दुपारी ४ वाजेच्या सुमारास गावात खंडोबाच्या यात्रेनिमित्त रथाची मिरवणूक निघाली होती. त्या मिरवणुकीत गोरख खंडागळे हे देखील दर्शनासाठी गेले होते. गर्दीमध्ये ते रथाजवळ खाली कोसळले. त्यावेळी रथाचे दगडी चाक त्यांच्या दोन्ही पायावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील रुग्णालयात सचिन खंडागळे (मुलगा) यांनी दाखल केले असता ते उपचारापूर्वीच मयत झाले. मयत गोरख खंडागळे यांच्या पश्चात २ मुले आणि २ मुली असा परिवार आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



## सीईओ स्वामी यांचा कारवाईचा बडगा
## कामचुकार मुख्याध्यापकासह दोन उपशिक्षक निलंबित

सोलापूर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांडे येथे कार्यरत असणारे विलास हनुमंत ओहोळ व प्रवीण कृष्णात घाडगे दोघे उपशिक्षक यांना आज मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी निलंबित केले आहे. या दोन्ही उपशिक्षकांवर शाळेत वारंवार गैरहजर राहणे, वारंवार रजेवर व विनापरवाना गैरहजर राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केल्याचे आरोप सिद्ध झाल्याने तसेच याबाबत खासदार, माढा यांनी १ सप्टेंबर व २ सप्टेंबर रोजीच्या आढावा बैठकीमध्ये गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी भेटी मध्ये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करत नाहीत असे निदर्शनास आले होते.

जिल्हा नियोजन बैठकीमध्ये दिलेले समक्ष सूचनेनुसार, गैरहजर राहून गैरशिस्तीचे वर्तन केल्याने शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरल्याने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ९ नोव्हेंबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी व गटविकास अधिकारी उत्तर सोलापूर यांनी उत्तर सोलापुरातील पाथरी येथे भेट दिली. अचानक असता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथरी ता. उत्तर सोलापूर येथील कार्यरत मुख्याध्यापक बसवराज कोळी व उपशिक्षक सतीश राठोड हे सरपंच व समस्थ ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्या समक्ष सदर शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक हे शालेय कामकाजात वेळेवर उपस्थित राहत नाहीत, कामकाज नीट करीत नाहीत. केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी भेटी मध्ये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करत नाहीत असे निदर्शना आले होते. या गैरशिस्तीच्या वर्तनाबाबत या दोघांनाही निलंबित करण्यात आले आहे.

### तिसरा डोळा
– प्रकाश पोरे



धरलं तर चावत, सोडलं तर चावत !!!

| कल्याण |
| --- |
| ---- |

| मेन बाजार |
| --- |
| ---- |

# कंत्राटी परिचारिकांच्या आयुष्यात उजाडली नवी पहाट

सुराज्य/मुंबई

राज्यात कोरोनाच्या संकट काळात अत्यंत निष्ठेने सेवा करून हजारो रुग्णांचे प्राण वाचवलेल्या ५९७ कंत्राटी परिचारिकांना आरोग्य खात्याच्या सेवेत कायम करण्याचा एक महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

त्यामुळे भवितव्याची चिंता करणाऱ्या या परिचारिकांच्या आयुष्यात नवी पहाट उजाडली आहे. आरोग्य खात्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बदलीतून जाता जाता ही एक अनोखी भेट दिली. कोरोना महामारीमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्था ढासळली होती. डॉक्टर आणि परिचारिका यांनी कोरोना काळात जिवाची बाजी लावत काम करत कर्तव्य निभावले होते. या काळात कंत्राटी पद्धतीने कामावर घेतलेल्या शेकडो परिचारिकांना राज्य सरकारने दिलासा दिला. कोरोना महामारीचे संकट आले आणि काही समजून घ्यायच्या आत देशात लॉकडाऊन लावण्यात आला. कोरोना काळात आरोग्य व्यवस्था कोलमडली होता. या कोरोनाच्या संकटावर मात करण्यासाठी

### ▪ ५९७ जणांना सेवेत कायम करण्याचा निर्णय
### ▪ जाता जाता तुकाराम मुंढेंनी दिली अनोखी भेट

डॉक्टर, नर्स, पोलीस, यांच्यासह अधिकारी, कर्मचारी असे अनेक योद्धे पावलोपावली लढले. या संकटाच्या काळात परिचारिकांनी जिवाचे रान केले.

या सर्व परिचारिकांना कायमस्वरूपी शासनात समावेश करून घेण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला. कोरोना महामारीच्या काळात या परिचारिकांसोबत ११ महिन्यांचा करार केला होता. मात्र तो संपुष्टित आल्यानंतर या सर्व परिचारिकांना भविष्याची चिंता लागून होती. पण राज्य सरकारने केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करून या सर्व परिचारिकांना कायमस्वरूपी शासनात घेण्याचा निर्णय घेतला.

▪ **सेवेची दखल घेतली :** आरोग्य सेवा व संचालक आयुक्त येथून बदली होण्यापूर्वी तुकाराम मुंढे यांनी ५९७ कंत्राटी परिचारिकांना शासनात कायमस्वरुपी करण्याचा निर्णय जारी केला आहे. मुंढे हे कडक शिस्तीचे अधिकारी असले तरी आपल्या खात्यात होणाऱ्या चांगल्या कामाची दखलही ते घेत असतात. बदली होण्यापूर्वी परिचारिकांच्या आदेशावर त्यांनी स्वाक्षरी केली आणि परिचारिकांना न्याय दिला.

### ▪ काय आहे आदेश?
उपसंचालक, आरोग्य सेवा परीमंडळे यांनी त्यांचे मंडळातील एनयुएचएम, आरबीएसके, आदिवासी, बिगर आदिवासी, नक्षलग्रस्त व अर्बन आरसीएच कार्यक्रमाअंतर्गत रिक्त पदावर नेमणुका द्यावात. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ स्तरावर नेमणुका देताना सेवा जेष्ठता यादी तयार करावी व त्यानुसार समुपदेशाने रिक्त पदावर समायोजन करावे. आरोग्य सेविका एकाच दिवशी सेवेत रूजू झाल्या असतील तर त्यांची सेवा जेष्ठता ठरवाताना प्रथम एएनएस यांच्या शैक्षणीक पात्रतेचे शेवटच्या वर्षाचे गुण बघण्यात यावेत, ज्यांचे जास्त गुण असतील त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. जर शैक्षणीक पात्रतेचे गुण समान असतील तर ज्या आरोग्य सेविकेचे वय जास्त आहे, त्यांचे आधी समायोजन करावे. समायोजनाची प्रक्रिया १५ डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यस्तरावर सादर करावा.